# प्रेसनोट

दि.२७/१०/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | महेश अनंतराव पाटील, वय-५२ वर्ष, जिल्हा परिविक्षा अधिकारी, वर्ग-३, महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, सर्जेपुरा, अहमदनगर मुळ रा.मंत्रीचंड रेसिडेन्सी, पापाराम नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे विरुध्द सन २०२० मध्ये एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे मारामारीचा गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाची सुनावणी न्यायालयात सुरु आहे. न्यायालयाने तक्रारदार यांचेविरुध्द आणखी काही गुन्हे दाखल आहेत काय? याची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हा परिविक्षा अधिकारी यांना दिले होते. त्याअनुषंगाने तक्रारदार यांचेविरुध्द आणखी इतर गुन्हे दाखल नसलेबाबतचा अहवाल न्यायालयात पाठविणे करीता यातील आरोपी लोकसेवक महेश अनंतराव पाटील, वय-५२ वर्ष, जिल्हा परिविक्षा अधिकारी, वर्ग-३, महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, अहमदनगर हे रुपये ३०००/- ची मागणी करत असलेबाबतची तक्रार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेकडे दिली. त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने आज दि.२७/१०/२०२२ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक महेश अनंतराव पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष रुपये ३०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.२७/१०/२०२२ रोजी नगर शहरातील सर्जेपूरा येथील कार्यालयात लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष रुपये ३०००/- लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर बाबत तोफखाना पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर